# मराठी विज्ञान परिषद - नवी मुंबई विभाग

**पत्ता :** २९०६, सनबेरी, सेक्टर - ८, जिजामाता नगर, घणसोली, नवी मुंबई ४००७०१. **संकेतस्थळ :** www.mavipanavimumbai.org
**इ-मेल :** mvp.navimumbaivibhag23@gmail.com, **भ्रमणध्वनी :** ९८६९२१३७०३ / ९८१९०१७६३२ ■ **PAN NO.** AAATM7943G

**विभाग अध्यक्ष**
डॉ. किशोर कुलकर्णी

**विभाग उपाध्यक्ष**
श्री. शशिकांत धारणे
श्री. अनिल केळकर
डॉ. अरुंधती जोशी

**विभाग कार्यवाह**
श्री. अजय दिवेकर

**विभाग सहकोषाध्यक्ष**
कु. रेश्मा मासवकर

**सल्लागार**
श्री. सुभाष कुळकर्णी
श्री. ललित पाठक
डॉ. नंदू जोशी

**मुंबई मध्यवर्ती कार्यालयाचे पदाधिकारी**
**अध्यक्ष**
प्रा. ज्येष्ठराज जोशी

**कार्यवाह**
श्री. अ.पां. देशपांडे
श्री. दिलीप हेर्लेकर
प्रा. भालचंद्र भणगे

**कोषाध्यक्ष**
डॉ. दिलीप साठे

**विश्वस्त**
डॉ. विजय केळकर
श्री. प्रमोद लेले
डॉ. वसुधा कामत
प्रा. सुहास पेडणेकर
डॉ. अश्विनी भालेराव-गांधी
डॉ. अविनाश सुपे
डॉ. रावसाहेब पाटील

## एक दिवसीय विज्ञान संमेलन : २२ फेब्रुवारी २०२५ : वाशी.

मराठी विज्ञान परिषद (मविप) एक नोंदणीकृत स्वायत्त संस्था असून विज्ञानाचा प्रसार व प्रचार तसेच सामान्य माणूस आणि लहान मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचे कार्य गेली ५८ वर्षे करत आलेली आहे. या लोकजागृतीच्या कार्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने या संस्थेला अनेक पारितोषिके देऊन गौरविले आहे. त्याचबरोबर अनेक सामाजिक संस्थांनी मविपचा वेळोवेळी या यशस्वी वाटचालीसाठी सत्कार केला आहे. डॉ. वसंत गोवारीकर यांच्यासारखे शास्त्रज्ञ आणि श्री. प्रभाकर देवधर सारखे तंत्रज्ञ तसेच प्रा. भालचंद्र उदगावकर सारखे वैज्ञानिक व शिक्षणतज्ञ हे या संस्थेचे माजी अध्यक्ष होते. सांप्रत प्रा. जेष्ठराज जोशी हे मध्यवर्ती संस्थेचे अध्यक्ष आहेत. 'मविप'चे महाराष्ट्रात व राज्याबाहेर मिळून ६५ संलग्न विभाग आहेत. नवी मुंबई हा एक संलग्न विभाग आहे.

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून या वर्षी आम्ही नवी मुंबईकरांसाठी एक दिवसीय विज्ञान संमेलनाची मेजवानी २२ फेब्रुवारी २०२५ ला सकाळी ९:३० पासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत घेवून येत आहोत. एक दिवसाच्या या संमेलनाला महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाचे सहआयुक्त श्री. उल्हास इंगवले प्रमुख पाहूणे म्हणून लाभले असून ते "अन्न व औषध प्रशासन आणि सामाजिक बांधिलकी" या विषयावर बोलणार आहेत. नामवंत व प्रस्थापित उद्योजकांचे नवीन उद्योजकांना प्रेरीत करणारे स्वानुभव "उद्योजक बनू या" या कार्यक्रमातून सादर केले जाणार आहेत. यात सहभागी होतील प्रसिद्ध बांधकाम तज्ञ डॉ. सुरेश हावरे, प्रथितयश उद्योजक श्री. अशोक खाडे आणि उपक्रमशील उद्योजक श्री. रविंद्र नेने.

कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावरील परिसंवादात पुण्याचे डॉ. संजीव तांबे आणि प्राध्यपिका डॉ. माधवी ठाकूरदेसाई हे सहभागी होत आहेत. प्रसिद्ध दंतवैद्यक डॉ. उल्हास वाघ यांचे मौखिक आरोग्यावर सदीप भाषण, स्वेच्छानिवृत्त पोलिस अधिकारी डॉ. विशाल माने यांचे 'सायबर गुन्हे आणि प्रतिबंध' हे भाषण होईल.

'उर्जा क्षेत्रात भारतापुढील आव्हाने व संधी' या विषयावर डॉ. महेश पाटणकर बोलणार आहेत तर उद्योजकांना भेडसावणारा ऊर्जेचा प्रश्न ते सौर ऊर्जेच्या माध्यमातून कसे सोडवतील तसेच केंद्र व राज्य सरकारच्या लोकोपयोगी योजना यावर मार्गदर्शन करतील डॉ. दीपक कोकाटे.

शिवाय तुमच्या आमच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे अन्न पदार्थातील भेसळ. ही भेसळ घरच्या घरी कशी ओळखावी त्याचे प्रात्यक्षिक सादर केले जाणार आहे. यात खास करून महिला वर्गाचा तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी मविप मध्यवर्तीद्वारा आयोजित विज्ञान प्रयोग व प्रदर्शन. डॉ. उल्हास वाघ डेंटल स्पेशॅलिटी आणि संकल्प नॅशनल मेडिकल रिसर्च अँड सोशल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत मौखिक व दंतचिकित्सा शिबीर असा भरगच्च कार्यक्रम आहे. सुमारे ३०० प्रतिनिधी या अधिवेशनाला उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे. प्रथम येणाऱ्या प्राधान्य.

या संमेलनाच्या निमित्ताने एक विशेष स्मरणिकाही प्रसिद्ध करण्यात येणार आहे. राष्ट्रीय विज्ञान दिन केंद्रबिंदू मानून "विकसीत भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान" या संदर्भातील काही लेख जसे नविनीकरणक्षम ऊर्जा: सौर, अणू आणि इतर स्रोत. आजचे तंत्रज्ञान नॅनो टेक्नॉलॉजी, या बरोबरच "मनुष्याच्या शरीरात प्रवेश केलेल्या मायक्रोप्लॅस्टिक्स चे धोके", "कचरा नव्हे ही तर संपत्ती", "डावे उजवे यात अडकलेले प्रती जीवन", "देशोदेशीचा विज्ञान प्रसार", "तुम्ही डिटर्जंट वापरता? मग हे वाचा", "आजचे गुन्हे सायबर गुन्हे", "भारताचे कार्बन मार्केट" तसेच "विज्ञान तंत्रज्ञान आरोग्य आणि कृषि क्षेत्रातील नवीन काही". इत्यादी विषय मांडणारी ही स्मरणिका प्रकाशित केली जाईल. ती प्रतिनिधींना मोफत दिली जाणार आहे. नवी मुंबईकरांसाठी ही स्मरणिका म्हणजे अमूल्य ठेवा असेल.

नवी मुंबईतील सामान्य नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच गृहिणीसाठी ही संधी मविप, मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळ यांच्या सहकार्याने, वाशीच्या साहित्य मंदिर येथे उपलब्ध करून देत आहोत.

हे संमेलन ५०० रुपये भरून उत्सुक विज्ञानप्रेमी उपस्थित राहू शकतो. यामध्ये एक वेळचे जेवण, नाश्ता, चहा आणि हायटी देण्यात येईल. कार्यक्रमाची एक सुंदर बॅग, देण्यात येईल ज्यात स्मरणिका, लिहिण्यासाठी पॅड, पेन आणि इतर साहित्य असेल.

**(डॉ. किशोर कुलकर्णी)**
अध्यक्ष
मराठी विज्ञान परिषद, नवी मुंबई विभाग

# एक दिवसीय विज्ञान संमेलन: २२ फेब्रुवारी २०२५ : वाशी

स्थळ : साहित्य मंदिर सभागृह, वाशी, नवी मुंबई ४००७०३.
मराठी विज्ञान परिषद – नवी मुंबई विभाग
आणि मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळ, नवी मुंबई
संमेलनाध्यक्ष : प्रा. ज्येष्ठराज जोशी, कुलपति, आयसीटी मुंबई

---

मराठी विज्ञान परिषद नवी मुंबई आणि साहित्य संस्कृती व कला मंडळ वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी साहित्य मंदिर सभागृहात एक दिवसीय विज्ञान संमेलन आयोजित करण्यात येत आहे. संमेलनाचे अध्यक्ष मराठी विज्ञान परिषद मध्यवर्तीचे अध्यक्ष व आयसीटी मुंबईचे कुलपति प्रा. जे.बी. जोशी हे असतील. उद्घाटक श्री. अ.पां. देशपांडे मध्यवर्ती कार्यवाह मराठी विज्ञान परिषद हे असतील. प्रमुख पाहूणे अन्न व औषध प्रशासनाचे सह आयुक्त श्री. उल्हास इंगवले हे भूषवतील.

**- कार्यक्रम-**

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ०९-३० – १०.०० | प्रतिनिधी नोंदणी आणि अल्पोपहार व चहापान |
| सकाळी | १०.०० – १०.०५ | उद्घाटन श्री. अ.पां. देशपांडे |
| सकाळी | १०.०५ – १०.२० | अध्यक्ष : प्रा. जेष्ठराज जोशी यांचे मार्गदर्शन |
| सकाळी | १०:२० – ११.०० | अतिथी व्याख्याते : श्री. उल्हास इंगवले सह-आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र शासन, मुंबई. विषय - अन्न व औषध प्रशासन व सामाजिक बांधिलकी. |
| सकाळी | ११.०० – १२.३० | उद्योजक बनू या : नामवंत व प्रस्थापित उद्योजकांचे नवीन उद्योजकांना प्रेरीत करणारे स्वानुभव, सहभाग : डॉ. सुरेश हावरे, श्री. रविंद्र नेने आणि श्री. अशोक खाडे |
| दुपारी | १२.३० – १.१५ | मौखिक आरोग्य - डॉ. उल्हास वाघ सदीप भाषण |
| दुपारी | १.१५ – २.०० | जेवण |
| दुपारी | २.०० – ३-३० | कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंवाद सहभाग : डॉ. संजीव तांबे, प्रा. डॉ. माधवी ठाकूरदेसाई |
| दुपारी | ३.०० – ३.३० | भेसळ कशी ओळखावी – प्रात्यक्षिकावर आधारीत कार्यक्रम. |
| दुपारी | ३.३० – ४.१५ | सायबर गुन्हे आणि प्रतिबंध (भाषण) – श्री. विशाल माने |
| दुपारी | ४.१५ – ४-३० | अल्पोपहार व चहा |
| सायंकाळी | ४.३० – ५.०० | ऊर्जा क्षेत्र : भारतापुढील आव्हाने व संधी. – डॉ. महेश पाटणकर |
| सायंकाळी | ५०० – ५-३० | रिन्युएबल एनर्जी (नवीनीकरणक्षम) आणि एनर्जी एफिशिएन्सी : केंद्र आणि राज्य सरकारी लोकोपयोगी योजना. डॉ दिपक कोकाटे |
| सायंकाळी | ५.३० – ६.०० | समारोप |

## मुलांसाठी कार्यशाळा : सुमारे ३०० विद्यार्थी लाभ घेतील.

सकाळी ९.०० ते संध्याकाळी ६.०० पर्यंत इन्नोवेशन प्रयोगशाळा व त्यातील प्रयोग मविप मध्यवर्ती द्वारा.

दुपारी २.०० ते ५.०० मुलांसाठी मोफत मौखिक व दंत चिकित्सा सल्ला व वेळ असल्यास उपचार डॉ. उल्हास वाघ डेंटल स्पेशॅलिटी आणि संकल्प नॅशनल मेडिकल रिसर्च अँड सोशल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित.

दुपारी २.०० नंतर प्रयोग व आरोग्य शिबीर समांतर चालेल. मधल्या वेळेत विज्ञान रंजन व विज्ञान कथा व वैज्ञानिकांचे किस्से आलटून पालटून.

**सादरकर्ते : अल्पना कुलकर्णी, मृणालिनी साठे आणि गौरी देशपांडे**

सकाळी ११ ते संध्याकाळी ५.००

अन्न आणि औषध प्रशासणाची फिरती प्रयोगशाळा ज्यात अन्नातील भेसळ कशी ओळखावी हे प्रयोग प्रत्यक्ष दाखवण्यात येतील.

# एक दिवसीय विज्ञान संमेलन: २२ फेब्रुवारी २०२५ : वाशी

स्थळ : साहित्य मंदिर सभागृह, वाशी, नवी मुंबई ४००७०३.
मराठी विज्ञान परिषद – नवी मुंबई विभाग
आणि मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळ, नवी मुंबई
संमेलनाध्यक्ष : प्रा. ज्येष्ठराज जोशी, कुलपति, आयसीटी मुंबई

---

## प्रतिनिधी नोंदणी अर्ज

**नाव :** श्री / श्रीमती / डॉ. / प्रा. ______________________________________________

**संपूर्ण पत्ता :** ______________________________________________

______________________________________________

**इ-मेल :** ______________________ **भ्रमणध्वनी / दूरध्वनी (एसटीडी) :** ____________

**व्यवसाय :** ______________________ **जन्मतारीख :** ____________

**आणीबाणीच्या संपर्कासाठी नाव :** ____________ **भ्रमणध्वनी :** ____________

संमेलन प्रतिनिधी नोंदणी शुल्क : ₹ ५०० (चहा, नास्ता, जेवण, संमेलन कीट खर्चासहित)

धनादेश ☐ / धनाकर्ष (डी.डी.) ☐ / रोख रक्कम ☐ डायरेक्ट बँक खात्यामध्ये ☐ इतर ☐

धनादेश क्रमांक : ____________ दिनांक : __________

बँकेचे नाव : ______________ शाखा : __________

संमेलन प्रतिनिधींना प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर प्रवेश मिळेल. आधी नोंदणी करणे अनिवार्य आहे.

(अधिवेशन नोंदणी शेवटची तारीख २० फेब्रुवारी, २०२५ आहे.)

E-mail : mvp.navimumbaivibhag23@gmail.com / divekar.baba@gmail.com

शुल्क भरण्याकरिता बँक तपशील खालीलप्रमाणे धनादेश **'मराठी विज्ञान परिषद नवी मुंबई विभाग'** या नावे असावा.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
MARATHI VIDNYAN PARISHAD
NAVIMUMBAI VIBHAG
mvpnvm@mahb
ALL-IN-1 QR CODE

**प्रतिनिधी सही**

पावती क्रमांक : _______

**Bank Details for Payment**

| | | |
|---|---|---|
| Account Holder | : | Marathi Vidnyan Parishad Navi Mumbai Vibhag |
| Bank Name | : | Bank Of Maharashtra |
| Bank Branch Name | : | Vashi Branch |
| Bank Account No. | : | 20102039148 |
| IFS Code No. | : | MAHB0000353 |